# मुख्यमंत्री यूवा कार्य प्रशिक्षण योजना

सर्व नोकरी करण्यास इच्छूक उमेदवारांना सुचित करण्यात येते की, शासन निर्णय क्र.कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग क्रमांक. 2024/प्र.क्र.90/ व्य शि-3, दि.09 जुलै 2024 या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अहमदनगर जिल्हयामध्ये कार्यान्वित झालेली आहे. सदर शासन निर्णयानुसार पोलीस अधीक्षक,अहमदनगर कार्यालयांतर्गत सदर योजनेकरीता लिपीक तथा डाटा एंट्री ऑपरेटर ची शिकाऊ उमेदवारांची पदे खालील प्रमाणे कार्यालय व पोलीस स्टेशन येथे मानधनावर भरावयाची आहेत.

| अ.क्र. | कार्यालये | पोलीस स्टेशन/शाखा | भरावयाची शिकाऊ उमेदवारांची पदे |
|---|---|---|---|
| 1 | पोलीस अधीक्षक कार्यालय अहमदनगर | पोलीस अधीक्षक कार्यालय,अहमदनगर | 22 |
| 2 | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय नगर शहर | कोतवाली,तोफखाना,भिंगार कॅम्प, नगर तालूका | 10 |
| 3 | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय नगर ग्रामीण | एमआयडीसी,सुपा,पारनेर | 08 |
| 4 | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय श्रीरामपूर | श्रीरामपूर शहर, श्रीरामपूर तालूका,राहूरी | 08 |
| 5 | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय शिर्डी | शिर्डी,राहाता,कोपरगांव शहर, कोपरगांव तालूका,लोणी | 12 |
| 6 | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय संगमनेर | संगमनेर शहर, संगमनेर तालूका, घारगांव,आश्वी,अकोले,राजूर | 14 |
| 7 | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय शेवगांव | शेवगांव,पाथर्डी,नेवासा,सोनई, शनिशिंगणापूर, | 12 |
| 8 | उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय कर्जत | कर्जत,जामखेड,श्रीगोंदा,बेलवंडी, मिरजगांव,खर्डा, | 14 |
| | | **एकूण** | 100 |

**सदर योजनेकरीता उमेदवारांची पात्रता खालील प्रमाणे असेल**

1.उमेदवाराचे किमान वय 18 ते कमाल 35 वर्षे असावे.

2.उमेदवारांची किमान शैक्षणिक पात्रता पदवी/पदव्युत्तर असावी. तसेच मराठी टंकलेखनाचा वेग किमान 30 शब्द प्रतिमिनीट किंवा इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान 40 शब्द प्रतिमिनीट य अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा अथवा या उददेशासाठी शासनाने समकक्ष म्हणून घोषीत केलेली प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.

3.महाराष्ट्र शासनाच्या माहीती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळणी बाबतची प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.

4.मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेत सहभागास पात्र असणार नाहीत.

3.उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा.

4.उमेदवाराची आधार नोंदणी असावी.

5.उमेदवाराचे बॅक खाते आधार सलग्न असावे.

6.उमेदवाराने कौशल्य,रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करुन रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.

7.उमेदवाराने अर्ज भरताना उपरोक्त ठिकाणापैकी एकाच ठिकाणाकरीता अर्ज सादर करावा.

8.सदर कार्य प्रशिक्षणाचा कालावधी 6 महिने असेल.

9.सदरच्या सहा महिन्याच्या कालावधीसाठी उमेदवारांना या योजनेंतर्गत शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येणार आहे.

Scanned by CamScanner

नमूद अटी व शर्ती पुर्ण करीत असलेल्या उमेदवारांनी दिनांक 07/10 /2024 रोजी सकाळी 11.00 वा. पोलीस मुख्यालय,सर्जेपूरा-अहमदनगर येथे अ.क्र. 01 ते 06 मध्ये दर्शविलेले मुळ कागदपत्रे व छायांकीत प्रतीसह उपस्थित राहावे.

(राकेश ओला)
पोलीस अधीक्षक,अहमदनगर

प्रति,

पोनि.सायबर पोलीस स्टेशन
2/- सदरची जाहीरात या कार्यालयाचे www.ahmednagarpolice.org वर प्रसिध्द करावी.
सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,अहमदनगर
2/- सदरची जाहीरात www.mahaswayam.gov.in वर प्रसिध्द करावी.

Scanned by CamScanner